**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## प्रथम कुलगुरु डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला २७ ऑगस्टला

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने व डॉ. कमलाताई काशीराव देशमुख, नागपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून डॉ.के.जी. देशमुख स्मृती ग्रामगीता व्याख्यानमालेचे आयोजन स्वातंत्र सैनिक श्री कन्हैयालालजी रामचंद्र इन्नान्नी महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशिम येथे सोमवार, दि. २७ ऑगस्ट, २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भुषविणार असून ‘उच्चशिक्षण आणि आव्हाने’ या विषयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. हरिभाऊ केदार सन्माननीय वक्ते म्हणून अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, विद्याभारती शैक्षणिक मंडळ, अमरावतीचे अध्यक्ष श्री रावसाहेब शेखावत, दानदाते डॉ.श्रीमती कमलताई काशीराव देशमुख, नागपूर यांची प्रामुख्याने उपस्थिती याप्रसंगी लाभणार आहे.

कारंजा (लाड) येथील व्याख्यानमालेकरिता सर्व नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. अजय देशमुख व स्वातंत्र सैनिक श्री कन्हैलालजी रामचंद्र इन्नानी महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशिमचे प्राचार्य डॉ.पी.आर. राजपूत यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०६/०८/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी